
आत्ती: सात्विक सौंदर्याचा अमृतानुभव

पाच दशकांपेक्षा अधिक काळ पडद्यावर वावरणाऱ्या आणि चाहत्यांच्या मनावर राज्य करणाऱ्या 'सुलोचना' या नावाची जादूच काही और आहे. सुलोचनाजींविषयी आजवर अनेकांनी विपुल लेखन केलंय. त्यांची कन्या कांचन यांनी सुलोचनाजींच्या पंचाहत्तरीनिमित्त आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देऊन पडद्यामागची आई उलगडली तेव्हा...

□ कांचन घाणेकर



माझ्या जन्मानंतर अवघ्या पंधराच दिवसांत आत्ती म्हणजे माझी आई, प्रसिद्ध अभिनेत्री सुलोचना हिने मला माझ्या आजीच्या स्वाधीन केलं आणि ती पुन्हा अभिनयाकडे वळली. आजी आणि वडिलांच्या मायेच्या पंखांखाली मी मोठी होऊ लागले. त्यामुळे मी आजीलाच आई म्हणू लागले. आईची उणीव मला कधी भासलीच नाही.

माझ्या लहानपणीची एक आठवण सांगते. आम्हा मुलांना भेटायला आई कोल्हापूरला आली होती. मी धावत जाऊन माझ्या आजीला सांगितलं, 'आई, आई, तुला भेटायला बाहेर कोणीतरी बाई आली आहे.' माझं हे बोलणं ऐकल्यावर घरातले सगळे हसू लागले. मागाहून मला कळलं की ती माझी आई आहे.

आई म्हणून आत्तीची भेट झाली ती अशी. त्यानंतर मात्र ही आपली जन्मदाती आई आहे हे मला कळू लागलं. पण मामे भावंडांप्रमाणे मीही तिला आत्तीच म्हणत असे. माझ्या वडिलांच्या निधनानंतर आत्तीने आम्हाला तिच्याजवळ मुंबईला आणलं आणि मग आमचा सहवास खऱ्या अर्थाने सुरू झाला.

मी माझ्या आईचं एकच अपत्य. मात्र माझ्याबरोबर तिने सगळ्या मामे भावंडांनाही आपल्यासोबत मुंबईला शिक्षणासाठी आणलं. आम्हाला किंग जॉर्ज शाळेत घातलं. माझ्या इतर भावंडांप्रमाणे मला मात्र मुंबईच्या शिक्षणाशी जुळवून घेणं सुरुवातीला जमलं नाही. कोल्हापूरच्या तुलनेत इथलं शिक्षण थोडं कठीण वाटत होतं. म्हणून मग मी शाळेत जायचा कंटाळा करू लागले.

आत्ती तिच्या कामात व्यग्र असली तरी तिचं आमच्या शिक्षणाकडे बारीक लक्ष असायचं. आम्ही सर्व मुलांनी किमान ग्रॅज्युएट व्हावं ही तिची इच्छा होती. मी अभ्यासाच्या बाबतीत टंगळमंगळ करतेय हे लक्षात आल्यावर सुरुवातीला आत्तीने मला प्रेमाने समजावून पाहिलं. तरीही मी बधत नाही हे पाहून अखेरीस एक दिवस तिने मला एका खोलीत नेलं, आतून कडी घातली आणि डोक्यापासून पायापर्यंत फोडून काढलं. त्यानंतर माझी शिक्षणाची गाडी जी मार्गी लागली ती अगदी एम.ए. होईपर्यंत तिच्यात खंड पडला नाही.

माझ्या लहानपणी मी आत्तीला सतत काम करतानाच पाहिलं. ती तीन-तीन शिफ्टमध्ये काम करत असे. अनेकदा थकून भागून घरी यायची. पण आम्हा मुलांचा अभ्यास, प्रगती आणि प्रकृती याची तिला बित्तंबातमी असायची. सेटवरूनही ती फोन करून आमची



इतरांच्या कौतुकात सहभागी होणाऱ्या सुलोचनाजींसह कांचन

चौकशी करत असे.

सुट्टीच्या दिवशी आत्ती सगळा वेळ आम्हा मुलांसाठी राखून ठेवत असे. तिला रजा असली की आमच्या जीवाची मुंबई. दिवसभर हॉटेलमध्ये खाणं, शॉपिंग करणं, एखादा चित्रपट नाहीतर नाटक बघणं, जुहूवर भेळ खायला जाणं असे एक ना दोन अनेक बेत आखले जायचे. आम्हा मुलांच्या सहवासात ती आपला सगळा शीण विसरून जात असावी.

आत्तीच्या कारकीर्दीचा तो सुवर्णकाळ होता. दारात दोन दोन गाड्या उभ्या असायच्या. पण त्या श्रीमंतीची धुंदी तिला कधी चढली नाही की तिने आम्हाला चढू दिली नाही. तेव्हा आम्ही सायनला रहात असू. त्यामुळे बस किंवा ट्राम करूनच शाळेत जात असू. त्यासाठीही किंग्ज सर्कलपर्यंत चालत जावं लागायचं. पण दारात गाड्या आहेत म्हणून आम्हाला ती चंगळ आत्तीने कधीच करू दिली नाही. तिने आम्हाला सामान्य घरातल्या मुलांसारखंच वाढवलं. नाही म्हणायला दादरच्या रणजीत, श्रीसाऊंड किंवा रूपतारा स्टुडियोत चित्रीकरण असलं तर आत्तीबरोबर दिमाखात गाडीने शाळेत जायला मिळायचं.

तसाच आदर आणि प्रेम तिला तिच्या कार्यक्षेत्रातही मिळतंय. मला आश्चर्य वाटतं, अनेक मोठमोठ्या कलाकारांनाही त्याच त्याच भूमिकांत पाहून दर्शकांनी नाकारलं होतं. पण माझ्या आत्तीने पडद्यावर इतक्या चित्रपटांत तीच ती प्रेमळ, आदर्श, करारी आईची भूमिका साकारलीय तरी, लोकांना ती पाहायला आवडते. मी तर नेहमी गमतीने म्हणतेही, आमच्या आत्तीला पडद्यावरची मुलं खूप आहेत. ज्या ज्या कलाकारांच्या आईची भूमिका तिने पडद्यावर साकारली ते आजही तिला तीच आदर देतात. तिची लोकप्रियता तसूभरही कमी झालेली नाही. आत्तीने साकारलेली नायिका जशी सोज्वळ आणि शालीन असायची, तेच रूप पुढे तिच्या आईच्या भूमिकांतही दिसायचं. लोकांना आत्ती आपल्या घरातलीच आई-आजी वाटते ते तिच्या या वात्सल्यपूर्ण सोज्वळ रुपामुळेच!

१९९४ मध्ये आत्तीला पुण्याच्या गदीमा प्रतिष्ठानचा 'गदीमा पुरस्कार' मिळाला आणि त्यानंतर तिला अनेक जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाले. व्ही. शांताराम पुरस्कार जाहीर झाल्यावर तर पत्रकारांनी तिच्यावर मुलाखतींचा माराच सुरू केला. अनेक इंग्रजी नियतकालिकांनीही तिच्या



बालकलाकार महेश कोठारेवर मायेचा वर्षाव...



देव आनंदप्रमाणेच हिंदीतील अनेक कलाकारांची लाडकी आई

घरात भरपूर पैसा येतोय म्हणून भारंभार कपडे खरेदी केलेत असंही मला आठवत नाही. वर्षाकाठी दोन ड्रेस मिळायचे. एक दिवाळीला आणि दुसरा वाढदिवसाला. बस्स. मी एकुलती एक मुलगी आहे म्हणून मामे भावंडांपेक्षा मला जास्त किंवा भारी किंमतीच्या वस्तू देण्याचा भेदभावही तिने कधी केला नाही.

आत्ती घरात आई म्हणून आम्हा मुलांसाठी इतकी शिस्तप्रिय आणि करारी होती. आजही आहे. आजही माझ्या चाळीशी पार केलेल्या भावंडांना तिची भीती वाटते. आत्तीच्या नावाचा हा दबदबा पूर्वीइतकाच आमच्या घरात आहे.

पुरस्काराची दखल घेतली. आमच्यापेक्षा कणभर जास्तच प्रेम तिला तिच्या दर्शकांनी, चाहत्यांनी आणि पत्रकारांनी दिलं असेल.

आज आत्तीने वयाच्या पंचाहत्तरीत प्रवेश केलाय. पण तिचा उत्साह पूर्वीइतकाच दांडगा आहे. अगदी काल परवापर्यंत तिने अभिनयही केला. गेल्यावर्षी धर्मेंद्रबरोबर एक चित्रपट केला. अभिनय हाच आत्तीचा श्वास असल्याने ती त्याच्याविना जगू शकत नसावी. मुंबईत चित्रीकरण असेल तर ती कोणाही निर्मात्याला वयाचा बागुलबुवा पुढे करून नकार देत नाही. तिच्या ठायी असलेली ही ऊर्जा आम्हाला प्रेरणादायी ठरतेय.

□ शब्दांकन: स्मिता प्रकाशकर